# नांदगाव परिसर गारठला

## शेतीकामांना खीळ; साथीच्या आजारांत वाढ

**नांदगाव । प्रतिनिधी**



शहर व तालुक्यात पारा १२ अंशापर्यंत खाली आल्याने दिवसभर अंगातील हुडहुडी जात नाही. पहाटेपासून थंडीचा कडाका वाढत जातो, सकाळी दहापर्यंत थंडी घराबाहेर पडू देत नाही. त्यात दिवसभर थंड वारे वाहत असल्याने गारठा जात नाही. आगामी आठ दिवस तापमान असेच राहणार असल्याने गारठा वाढण्याची शक्यताही हवामान विभागाने वर्तवली आहे.


परतीच्या पावसाने काही दिवस सातत्य ठेवल्यानंतर हवामानात बदल झाला. आता थंडीने चांगलाच कहर केला आहे. नागरिक घरात असलेले उबदार कपडे वापरत आहेत. तरीही नव्या उबदार कपड्यांची खरेदी केली जात आहे. मध्यंतरी ढगाळ व पावसाळी हवामानामुळे एकदमच थंडी गायब झाली होती. त्यानंतर आता थंडी सुरू झाली आहे. किमान तापमान १२ अंश सेल्सिअस तर कमाल तापमानातही घसरण झाली आहे. सकाळी घराबाहेर पडणेही मुश्कील झाले आहे. सकाळी दहापर्यंत अंगातून थंडीच जात नाही. सायंकाळी साडेपाचनंतर थंडी पुन्हा वाढू लागते. सायंकाळी सात नंतर थंड वारे वाहण्यास सुरुवात होते. आगामी आठ दिवस किमान आणि कमाल तापमान असेच स्थिर राहणार असल्याचा अंदाज हवामान विभागाचा आहे. शेती, तळे, विहिरी, नदीच्या शेजारी गारठा अधिक जाणवतो. येथे सकाळी व रात्री कमालीची थंडी जाणवते.

जनावरांसाठी वैरण आणणे, दूध काढून ते सकाळी साडेसहापर्यंत संस्थेत घालणे ही लगबग सुरू असते. थंडीमुळे या कामावर परिणाम झाला आहे. मजूर, पिकांना पाणी देणाऱ्या शेतकऱ्यांना याचा सर्वाधिक त्रास होत आहे. ग्रामीण भागात सकाळी व सायंकाळी ठिकठिकाणी शेकोट्या पेटलेल्या दिसतात. थंडीमुळे नागरिकांना उबदार कपडे परिधान करून बाहेर पडावे लागत असून सर्दी खोकला, डोकेदुखी, थंडी व तापाच्या रुग्णांच्या संख्येत वाढ झाली असल्याचे दिसून येत आहे. या थंडीचा सर्वाधिक त्रास ज्येष्ठ नागरिकांना होत आहे. त्यामुळे थंडीपासून त्यांची काळजी घेणे महत्त्वाचे आहे. अनेकदा ही थंडी जीवघेणीही ठरू शकते.

अनेक नागरिक घरात असलेले उबदार कपडे वापरत आहेत. तसेच बाजारपेठांमध्ये उबदार कपड्यांची खरेदी वाढली आहे. स्वेटर, मफलर, जॅकेट, कानटोपी, हातमोजे, पायमोजे, ब्लँकेट, जर्किन यासारख्या कपड्यांची मागणी वाढली आहे. शहरासह ग्रामीण भागातील आठवडे बाजारामध्ये नागरिकांची मोठी गर्दी होत आहे. विक्रेत्यांनी दिलेल्या माहितीनुसार, गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा उबदार कपड्यांचे दर दहा ते पंधरा टक्क्यांनी वाढले आहेत. तरीही खरेदीवर परिणाम झालेला नाही.

# विहिरीत पडलेला बिबट्या जेरबंद

**मालेगाव । प्रतिनिधी**



तालुक्यातील खाकुर्डी गावानजीक असलेल्या डॉ. धनंजय पवार यांच्या शेतात नव्याने खोदकाम सुरू असलेल्या पाण्याने भरलेल्या विहिरीत शनिवारी पहाटे सुमारे सात वाजण्याच्या सुमारास बिबट्या पडल्याची घटना घडली. गावातील मजुरांनी विहिरीच्या कपारीत बिबट्या अडकलेल्या अवस्थेत पाहताच तत्काळ पोलिसांना माहिती दिली.

वनविभागाच्या माहितीनुसार, पहाटे भक्ष्याच्या शोधात आलेल्या बिबट्याला नव्याने खोदण्यात आलेल्या विहिरीचा अंदाज न आल्याने तो विहिरीत पडला. सुमारे २० फूट खोल असलेल्या विहिरीत १५ फूट पाणी होते, तर वरच्या बाजूस पाच फूट मोकळ्या कपारीत बिबट्या अडकून पडला होता. त्यामुळे त्याला बाहेर पडण्याचा कोणताही मार्ग उपलब्ध नव्हता. या संदर्भातील माहिती मिळताच सहाय्यक पोलीस निरीक्षक पुरुषोत्तम शिरसाठ यांनी तातडीने मालेगाव वनविभागाला कळविले. वनपरिक्षेत्र अधिकारी गायत्री सोनवणे आपल्या पथकासह घटनास्थळी दाखल झाल्या. कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी परिसरात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला. वनविभाग, पोलीस आणि सर्पमित्रांच्या सहकार्याने सुमारे सहा तास चाललेल्या शर्थीच्या रेस्क्यू ऑपरेशननंतर बिबट्याला सुखरूपपणे जेरबंद करण्यात यश आले. या रेस्क्यू मोहिमेत वनपरिक्षेत्र अधिकारी गायत्री सोनवणे यांच्यासह सोनल पवार, दीपक हिरे, संजीव भदाणे, स्वाती सावंत, अनिल ठाकरे, नंदीनी बच्छाव, योगेश पाटील आदी वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

दरम्यान, बिबट्याला प्राथमिक उपचारांसाठी लुल्ले येथील नर्सरीत दाखल करण्यात आले असून पुढील उपचारांसाठी नाशिक येथील रेस्क्यू सेंटरकडे पाठवण्यात येणार आहे. दरम्यान, जेरबंद करण्यात आलेल्या बिबट्याला विराणे वनहद्दीत सोडण्याच्या हालचालींना विरोध करत विराणे ग्रामस्थांनी काही काळ खाकुर्डीसाक्री महामार्गावर रास्ता रोको आंदोलन केले. पोलिसांच्या मध्यस्थीनंतर हे आंदोलन मागे घेण्यात आले.

# भांडणाची कुरापत काढून मारहाण

**निफाड ।** चाटोरी येथे मागील भांडणाची कुरापत काढून सिद्देश भिवसेन हिरे, (रा.चाटोरी) या खासगी नोकरी करणाऱ्या तरुणास मंगळवारी (दि.९) गावातील शनीमंदिरासमोर हिरे हा आपला मित्र सुजित श्यामराव कापसे याचेबरोबर गप्पा मारत असतांना मंगेश भालेराव, गणेश भालेराव, बाळा कटारे, रोहन कटारे, राजू खाडे (सर्व रा.चाटोरी) यांनी संगनमत करून कुरापत काढून शिवीगाळ करत मारहाण केली. या मारहाणीत धारदार हत्याराने हिरे याच्या कपाळावर वार करण्यात येवून जखमी करण्यात आले. याबाबत सायखेडा पोलीस ठाण्यात मारहाण व दुखापतीचा गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस हवालदार पगारे अधिक तपास करत आहे.

## टायटल व्हेरीफिकेशनकामी नोटीस

तमाम लोकांस या नोटीसीने कळविण्यात येते की, ता.जि.नाशिक पैकी **मौजे दसक** या गांवचे शिवारातील **सर्व्हे नं.५५/४/प्लॉट/१६** यांसी क्षेत्र १८५.२५ चौ.मी. व **सर्व्हे नं.५५/४/प्लॉट/१७** यांसी क्षेत्र २२१.२५ चौ.मी.असे एकुण क्षेत्र ४०६.५० चौ.मी. यावरील बांधीव **शिवधारा को.ऑप.हौसिंग सोसायटी लि.** यातील इमारतीमधील तळ व पहिल्या मजल्यावरील **रो-हाऊस नं.३** यांसी **अंदाजित क्षेत्र १००.८३ चौ.मी.**, ज्यात मोकळ्या जागेचे क्षेत्र ५.८३ चौ.मी. व रो-हाऊसचे बांधीव बिल्टअप क्षेत्र ९५.०० चौ.मी. व यांसी निव्वळ प्लॉटचे क्षेत्र ५४.८७ चौ.मी. ही रो-हाऊस मिळकत **श्री.अनंत दुल्लभ भावसार** यांचा मालकीहक्काची व कब्जातील आहे. सदर मिळकतीचे निर्वेधपणा तपासणीकामी नोटीस प्रसिध्द केली आहे. सदर मिळकतीवर इतर कोणाचाही कोणत्याही प्रकाराचा बोजा जसे की, गहाण, दान, लिज, लिन, अन्नवस्त्र, साठेखत, कोर्टदावा, करार, बक्षिसपत्र, कब्जा पावती, विसार पावती, मुखत्यार पत्र, कबुलीपत्र, उसनवार वगैरे व इत्यादी सारखा बोजा असल्यास त्यांनी सदरची टायटल व्हेरीफिकेशन नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **०७ दिवसांचे आत** आमचे खालील नमुद पत्त्यावर समक्ष येऊन आमची कागदपत्रानिशी मुदतीत खात्री पटवुन द्यावी. तसेच परस्पर वर्तमानपत्रात घेतलेल्या हरकतींची दखल घेतली जाणार नाही. मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकत ही निर्वेध व बिनबोजाची आहे, असे समजण्यात येईल व टायटल क्लिअर सर्टीफिकेट देण्यात येईल व मग मागाहून कोणाचीही तक्रार व हरकत ऐकली जाणार नाही, याची नोंद घ्यावी. कळावे, ही नोटीस. दि.१४/१२/२०२५.

**श्री.सुरेश तुकाराम भोसले,** ॲडव्होकेट व नोटरी
**श्री.मयुर सुरेश भोसले,** ॲडव्होकेट
प्लॉट नं.२,ओम नगर,सैलानी बाबा स्टॉप,जेलरोड,नाशिकरोड,नाशिक.मो८६६८५५१९३५

HDFC BANK
We understand your world

**नोंदणीकृत कार्यालय :** एचडीएफसी बँक हाऊस, सेनापती बापट मार्ग, लोअर पेरल (प.) मुंबई-४०००१३ आणि रिटेल पोर्टफोलिओ मॅनेजमेंट ऑफीस : एचडीएफसी बँक लि. पहिला मजला, आंय-थिंक टेक्नो कॅम्पस, कांजूरमार्ग (पू.) मुंबई- ४०००४२

## लिलाव विक्री सूचना

कर्जदारांना, विशेषतः, आणि सामान्यतः जनतेला, याद्वारे सूचित केले जाते की खालील खात्यांमध्ये तारण ठेवलेल्या सोन्याच्या दागिन्यांचा/सुरक्षेचा सार्वजनिक लिलाव आयोजित करण्याचा प्रस्ताव आहे. एचडीएफसी बँक लिमिटेड (बँक) ने कर्जाची थकबाकी भरण्यासाठी नोटीस देऊनही, त्यांनी स्वाक्षरी केलेल्या आणि स्वीकारलेल्या कर्ज कराराच्या अटींनुसार, ज्या कर्जदारांनी पैसे देण्यास चूक केली त्यांच्या सोन्याच्या दागिन्यांचा/सुरक्षेचा लिलाव आहे. बँकेने कर्जदारांना एक नोटीस देखील जारी केली होती ज्याद्वारे, खालील खात्यांमधील संपूर्ण थकबाकीची परतफेड करण्यासाठी ७ दिवसांचा कालावधी देण्यात आला होता, असे न झाल्यास पुढील नोटीस जारी न करता संपूर्ण तारण सोन्याच्या सुरक्षिततेचा लिलाव करण्यास बँकेला स्वातंत्र्य असेल. कर्जदारांनी दुर्लक्ष केले आणि पेमेंट करण्यात अयशस्वी झाले, म्हणून, बँकेने कर्ज करारांतर्गत आपल्या अधिकारांचा वापर करताना तारणदार म्हणून सोन्याचे दागिने/सुरक्षा लिलावाद्वारे विकून सोन्याच्या सुरक्षेवरील तारण लागू आणि कर्जदारांकडून बँकेकडे असलेली थकबाकी वसूल करण्याचा निर्णय घेतला आहे.

**२२/१२/२०२५ रोजी दुपारी ३.३० वाजेपासून खाली नमूद केलेल्या शाखेत लिलाव केले जातील. नमूद केलेल्या तारखेला तारण ठेवलेल्या कोणत्याही तारणाचा लिलाव आयोजित केला जाऊ शकत नाही किंवा पूर्ण केला जाऊ शकत नाही तर, त्यानंतरच्या कोणत्याही तारखेला आणि वेळेस उक्त लिलाव आयोजित करण्याचा किंवा पुढे जाण्याचा अधिकार बँकेकडे आहे.**

| कर्ज नंबर | कर्जदाराचे नाव | कर्ज रक्कम | लिलावाचे स्थान |
|---|---|---|---|
| ७५५१७९१८ | समीर अर्जुन भिवसर | १४४००० | एचडीएफसी बँक शॉप क्र. ३, मिथिला अपार्टमेंट्स, बिटको पॉइंट, नाशिक रोड, नाशिक, महाराष्ट्र ४२२१०१ |
| ७५८७४१०४ | साहेबराव संभाजी घुगे | १८२५०० | तळमजला, चांडक प्लाझा, मालेगाव रोड, नांदगाव, नाशिक. ४२३१०६ |

सदर लिलाव हा जसे आहे जेथे आहे आणि जसे आहे जे काही आहे तत्त्वावर घेण्यात येईल आणि बँक सदर सुवर्ण आभूषणांच्या गुणवत्ता, शुद्धत्ता, कॅरट, वजन किंवा मूल्याच्या संदर्भात कोणतीही हमी देत नाही किंवा प्रतिनिधित्व करीत नाही किंवा करणार नाही. आपली बोली सादर करण्यापूर्वी सदर सुवर्ण आभूषणांच्या गुणवत्ता, शुद्धत्ता, कॅरट, वजन किंवा मूल्याच्या संदर्भात पडताळणी करून खात्री करून घेण्याची संपूर्ण जबाबदारी संभाव्य खरेदीदाराची असेल आणि यासाठी लिलाव सुरु होण्याच्या ४५ मिनिटे अगोदर वर नमूद पत्त्यावर जाऊन आपल्या स्वतःच्या खर्चाने सदर सुवर्ण आभूषणांची पडताळणी ते स्वतः किंवा कुणा तज्ञामार्फत करू शकतात. सर्व बोली बँक या संदर्भात ठरवेल त्या किमान आरक्षित किमतीच्या अधीन असतील. लिलावाचे मूल्य आदल्या दिवशीच्या आयबीजेए (इंडिया बुलियन अँड ज्वेलर्स असोसिएशन लि.) नुसार सोन्याच्या बंद किंमतीवर आधारित असेल. अशा लिलावाच्या अनुषंगाने लिलाव प्रक्रिया आणि विक्री (असल्यास) अशा पुढील अटी व शर्तींच्या अधीन असेल ज्या बँक तिच्या विवेकबुद्धीनुसार लादण्यास योग्य वाटेल. जर वर नमूद केलेल्या कर्जदाराने (ने) वर नमूद केल्याप्रमाणे कर्ज कराराच्या अटींनुसार बँकेची देय रक्कम त्याच्या वैयक्तिक कर्ज खात्यात लिलावापूर्वी पूर्ण भरली तर, कर्ज सुरक्षित करणारे गहाण दागिने बँकेकडून पुढील कोणत्याही सूचना न देता लिलावातून काढले जाऊ शकतात. कृपया लक्षात घ्यावे की कुठलेही कारण न देता कोणतीही किंवा सर्वच बोली फेटाळण्याचा किंवा कोणतीही पूर्वसूचना न देता लिलावाची प्रक्रिया रद्द करण्याचा किंवा पुढे ढकलण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार प्राधिकृत अधिकारी यांचा असेल.

**तारीख : १५/१२/२०२५ । स्थळ: नाशिक** सही/- **प्राधिकृत अधिकारी,एचडीएफसी बँक लि.**

## मोरे जयंती साजरी

**डुबेरे ।** येथील जनता विद्यालयात कर्मवीर गणपत दादा मोरे यांची जयंती साजरी करण्यात आली. मुख्याध्यापक रंगनाथ उगले अध्यक्षस्थानी होते. पर्यवेक्षिका जयश्री पगारे, सुनील ससाणे, मारुती डगळे यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले.

## सार्वजनिकवाचनालयात मुंडेजयंती साजरी

**नायगाव ।** तालुक्यातील वडझिरे येथील क्रांतिवीर वसंतराव नारायणराव नाईक सार्वजनिक वाचनालयात काशाई तरुण मित्र मंडळाच्यावतीने माजी उपमुख्यमंत्री स्व. गोपीनाथ मुंडे यांना जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. त्यांच्या कार्याचा आदर्श ठेवून समाजाभिमुख उपक्रम राबवण्याचा संकल्प यावेळी तरुणांनी केला. यावेळी रवींद्र दराडे, भगवान बोडके उपस्थित होते.

SREI

**श्रेई इक्विपमेंट फायनान्स लिमिटेड**
CIN : U70101WB2006PLC109898
**नोंदणीकृत कार्यालय:** 'विश्वकर्मा', ८६ सी, टोपसिया रोड (दक्षिण), कोलकाता ७०००४६
**मुख्य कार्यालय :** प्लॉट क्र.-Y १०, ब्लॉक EP, सेक्टर- V, साल्ट लेक सिटी, कोलकाता ७०००९१
ई-मेल : sefl@srei.com
वेबसाईट : www.srei.com

## सार्वजनिक सूचना

**दिनांक १६ मार्च २०२६** पासून Srei Equipment Finance Limited (SEFL) ची नाशिक शाखा,
**पत्ता: १०६, पहिला मजला, रोनाक हाइट्स, राका कॉलनी, शरणपूर रोड, नाशिक ४२२००२,**
ही शाखा SEFL च्या मुंबई शाखेत विलीन करण्यात येत आहे.
**मुंबई शाखेचा पत्ता:**
युनिट क्र. ९०१, ९ वा मजला, A विंग, सुप्रीम बिझनेस पार्क, सुप्रीम सिटी, गाव पवई, मुंबई ४०००७६
**कोणत्याही चौकशीसाठी अथवा तक्रारींसाठी संपर्क करा :**
**श्री. सुरेंद्र कुमार अग्रवाल**
**(मुख्य नोडल अधिकारी)**
**मो.: ८६९६९११४४१**
**ई-मेल:** surendra@srei.com

## टायटल व्हेरीफिकेशन नोटीस

तमाम लोकांस या टायटल व्हेरिफिकेशनकामी नोटीसीने कळविण्यात येते की, तुकडी जिल्हा नाशिक, पोटतुकडी **तालुका सिन्नर** पैकी **मौजे जोगलटेंभी** या गांवचे शिवारातील शेतजमीन यांसी **गट क्र.३५६** यांसी क्षेत्र हे.०८.९७ आर + पोट खराबा हे. ०६.७२ आर यांसी आकार रुपये ०३=९१ पैसे, **पैकी क्षेत्र हे.००.३१ आर + पोट खराबा हे. ००.१७ आर** यांसी चतुःसिमा रेकॉर्ड ऑफ राईट्स प्रमाणे आकार रुपये ००=१४ पैसे ही मिळकत **श्री.सुनील संपत जाधव** यांची खरेदी मालकीची असून मिळकतीच्या रेकॉर्ड ऑफ राईट्सला वरील मालकांचे नाव मालक व कब्जेदार सदरी दाखल आहे. सदरील मिळकत ही पुर्णपणे निर्वेध व बोजारहीत असल्याचे सदर मालकाने सांगितले आहे. सदर मिळकतीचे टायटल तपासणे करिता सदर नोटीस प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

सबब, सदर मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध, बोजा, गहाण, दान, लिज, लिन, अन्नवस्त्र, बक्षिसपत्र, विसार पावती, जनरल मुखत्यार पत्र, मृत्युपत्र, इत्यादी अगर इतर कोणत्याही प्रकारचा हक्क व अधिकार असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून **१० (दहा) दिवसांचे आत** आपली हरकत लेखी स्वरूपात व साक्षांकीत पुराव्यासह नोंदवावी. परस्पर वर्तमानपत्रात जाहीर केलेली हरकत विचारात घेतली जाणार नाही. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास मिळकत संपुर्णपणे निर्वेध असल्याचे समजण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही हरकत विचारात घेतली जाणार नाही. तसेच ती सदर मिळकतीवर व आमचे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही. कळावे, ही जाहीर नोटीस. नाशिक. दिनांक १४/१२/२०२५..

**संदीप अशोक दळवी,** ॲडव्होकेट
चेंबर नं.३२१/१,मारुती चेंबर्स,जिल्हा न्यायालय आवार,नाशिक.मो.९८९०३८५९८७

**महाराष्ट्र शासन**

## सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग नाशिक, ता. जि. नाशिक

## ई-निविदा सूचना क्रमांक २५ सन २०२५-२०२६ (ऑनलाईन)

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, सा.बा. विभाग (उत्तर) नाशिक दूरध्वनी क्रं. ०२५३-२५७६२४९ हे खालील कामाची ब - १ नमुन्यातील ई निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या वर्गातील सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नोंदणीकृत मजूर सहकारी संस्था (फक्त नाशिक जिल्ह्यातील) यांचेकडून मागवित आहेत.

निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यांत यावी. तसेच निविदा स्विकारणे किंवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा. बा. विभाग (उत्तर) नाशिक यांनी राखून ठेवलेला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

सदर निविदा सूचनेत रुपये ३०.०० लक्षचे आतील एकुण ०१ (एक) कामे समाविष्ट असून या निविदा सूचनेत समाविष्ट कामांची संपूर्ण माहिती ( तपशील) खालील नमूद संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

१) https://mahatenders.gov.in

| | | | |
|---|---|---|---|
| कोऱ्या निविदा ऑन लाईन विक्री व निविदा सादर करण्याचा कालावधी | १५/१२/२०२५ रोजी ११:०५ पासुन | ते | २२/१२/२०२५ रोजी १७:०० पर्यंत |

टीप १. ई निविदेची किंमत (ना परतावा) व इसारा / बयाणा रक्कम फक्त ऑनलाईन पध्दतीनेच स्विकारली जाईल.
२. सर्व पात्र / इच्छुक निविदा करांनी निविदा पत्र डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रीयेत भाग घेण्यासाठी इ- निविदा प्रणालीच्या वेबसाईट https://mahatenders.gov.in या पोर्टलवर एनरोल्ड करणे आवश्यक आहे.
३. सदर कामाच्या निविदेसबंधी ठेकेदारासमवेत करावयाचा पत्रव्यवहार हा त्यांच्या सा.बां. खात्याकडील नोंदणी पत्रावरील नमूद पत्त्यावर करण्यात येईल तसेच पोस्टाच्या विलंबास हे कार्यालय जबाबदार असणार नाही.
४. सदर निविदा सूचनेचे प्रपत्र सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. - मावज - २०१८/प्र.क्र. ३४८ / ३४ दि. २० डिसेंबर २०१८ मधील पान क्र. २५ पैकी १० वरील रकाना क्र. ४.६.२ मध्ये दिल्यानुसार काढण्यांत आली आहे.
५. सदर निविदा सुचनेमध्ये निविदा सादर करण्याच्या अंतिम दिनाकांपर्यंत तपशिलात काही बदल झाल्यास तसे खालील बेबसाईटवरती कळविण्यांत येईल.
१. https://mahatenders.gov.in
२. www.mahapwd.gov.in

सही/- **कार्यकारी अभियंता,**
**सा.बां (उत्तर) विभाग, नाशिक**

**जा. क्र. जिमाका - नाशिक ४००/२०२५-२६**
**जिल्हा माहिती कार्यालय, वकीलवाडी, नाशिक.**
दिनांक :- १२/१२/२०२५.

# साधूग्राम त्र्यंबकेश्वरपासून दूर नको; साधूंची मागणी



**त्र्यंबकेश्वर । प्रतिनिधी**

त्र्यंबकेश्वरच्या सिंहस्थासाठी २१९ एकर जागेवर सिंहस्थ प्रशासनाने साधुग्राम उभारण्याचे नियोजन केलेले आहे. साधुग्राम त्र्यंबकेश्वरपासून जास्त दूर नको, त्र्यंबकेश्वरच्या पंचक्रोशीत हवे, अशी भूमिका साधू-महंतांनी शासनाकडे मांडली आहे.

या दृष्टीने शासनाकडे येथील कैलास राजानगरच्यापुढे पंचगंगा डोंगर पट्ट्याच्या पायथ्याशी असलेली मोकळी जागा शासनाने सिंहस्थासाठी घ्यावी, अशी मागणी विनंती साधू-महंतांनी करत तशी जागा देखील प्रशासनाच्या अधिकाऱ्यांना सुचवली आहे. वरील ठिकाणी भेट देऊन अशी मागणी झाली आहे.

यावेळी सिंहस्थ आयुक्त शेखर सिंह, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद तसेच आखाडा परिषदेचे महामंत्री हरीगिरीजी महाराज, त्र्यंबकेश्वरमधील महंत शंकरानंद सरस्वती महाराज, महंत धनंजय गिरी महाराज उपस्थित होते.

## स्विफ्ट कारची चोरी

**निफाड ।** निफाड शहरात दुचाकी, चारचाकी वाहनांच्या चोरीचे सत्र थांबता थांबेना. शहरातील गणेशनगर परिसरातील दत्तात्रय शंकर महाजन या ठेकेदाराच्या घरासमोरून बुधवारी (दि.१०) रात्रीच्या सुमारास पांढऱ्या रंगाची मारूती सुझूकी कंपनीचे स्विफ्ट व्ही.डी.आय ही चारचाकी कार (एम.एच.१५ बी.एम.८६४३) अज्ञात चोरट्यांनी वाहनाची काच फोडून वाहनात प्रवेश करुन कार चोरून नेल्याची घटना घडली. परिसरातील चारचाकी वाहन मालकांचे धाबे दणाणले आहे. गणेशनगर परिसरात घरफोडीच्या घटना घडत असतांना वाहनचोरीच्या घटनांमध्येही मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने शहरातील नागरिकांमध्ये घबराटीचे वातावरण निर्माण झाले आहे. निफाड पोलीस ठाण्यात वाहनचोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## टायटल व्हेरिफिकेशनकामी जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या प्लॉट मिळकती ह्या **श्री. प्रमोद शिवाजीराव देशमुख** यांच्या मालकीच्या व कब्जेवहिवाटीतील असून सदर प्लॉट मिळकती बिनबोजाच्या व निर्वेध आहेत असे त्यांचे म्हणणे आहे. तथापि सदर प्लॉट मिळकतीचे टायटल व्हेरिफिकेशनसाठी सदरची नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सबब सदर प्लॉट मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, दान, लिन, लिज, बक्षिस, मनाई हुकुम, करार, मदार, विसार वगैरे हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून **१५ दिवसांचे आत** आमचे खालील कार्यालयात मूळ प्रतीसह तक्रार नोंदवावी. वरील मुदतीत कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर प्लॉट मिळकती निर्वेध व बिनबोजाच्या आहेत असे समजून तसा ना हरकत दाखला देण्यात येईल. वरील मुदतीनंतर आलेली हरकत व लेखी पुरावा नसलेली तसेच परस्पर वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेली हरकत ग्राह्य धरली जाणार नाही व ती सदर प्लॉट मिळकतींवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

तुकडी जिल्हा नाशिक, पोट तुकडी तालुका दिंडोरी पैकी **मौजे दिंडोरी** या गांवचे शिवारातील बिनशेती मिळकत यांसी **गट नंबर / भूमापन क्रमांक व उपविभाग ५६१ / २ यावर अंतीमरित्या मंजुर केलेल्या ले आऊट प्लॅन मधील प्लॉट नंबर ८२, यांसी क्षेत्र ९९.५२ चौरस मीटर, प्लॉट नंबर ८३, यांसी क्षेत्र ६५.१० चौरस मीटर, प्लॉट नंबर ८४, यांसी क्षेत्र ६१.८० चौरस मीटर, प्लॉट नंबर ८५, यांसी क्षेत्र ६१.८० चौरस मीटर, प्लॉट नंबर ८६, यांसी क्षेत्र ६१.८० चौरस मीटर, प्लॉट नंबर ८७, यांसी क्षेत्र ६१.८४ चौरस मीटर व प्लॉट नंबर ८८, यांसी क्षेत्र ८२.४० चौरस मीटर,** यांसी चतु:सिमा मंजूर ले आऊट प्रमाणे. कळावे ही जाहीर नोटीस, नाशिक तारीख १४/१२/२०२५.

सही/- **राजेंद्र एच. गांधी,** ॲडव्होकेट
एफ १६, पहीला मजला, साठ्ये बाग, महात्मा गांधी रोड, नाशिक.
**फोन नंबर : ९८२२४७५६३६.**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन :** तुकडी जिल्हा नाशिक पोट तुकडी तालुका निफाड पैकी **मौजे उंबरखेड** या गांवचे शिवारातील **भूमापन क्र. २०१/१ यांसी एकुण क्षेत्र ०१ हे. ९१ आर +पोट खराबा ०० हे. ०.१ आर अशी एकुण ०१ हे. ९२ आर यांसी आकार रुपये ०८-९१ पैसे यापैकी श्री. सचिन मनोहर खोडे यांच्या मालकीची क्षेत्र ०० हे. ०.४१ आर यांसी आकार रुपये ०१-९१ पैसे व सुवर्णा सचिन खोडे यांच्या मालकीचे क्षेत्र ०० हे. ४० आर यांसी आकार रुपये ०१-८७ पैसे तसेच भूमापन क्रं. २०१/२ यांसी क्षेत्र ०१ हे. ९० आर +पोट खराबा ०० हे. ०१ आर यांसी एकूण क्षेत्र ०१ हे. ९१ आर यांसी आकार रुपये ०८-९० पैसे यापैकी हिराबाई मनोहर खोडे यांच्या मालकीचे क्षेत्र ०० हे. ६९ आर यांसी आकार रुपये ०५-०९ पैसे** असुन सदर मिळकतीचे व्यवहार आमचे पक्षकारा बरोबर निश्चित केलेला आहे.

तरी सदर मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारचे जसे लिन लिज अन्नवस्त्र, मृत्यूपत्र, करार मदार बक्षीस, जप्ती, जामिनकी, कोर्ट वाद वगैरे जडजोखमीत गुंतविलेली असल्यास अगर सदर मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा बोजा असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून **०७ दिवसांच्या आंत** आमचे खालील पत्यावर कागदपत्रांसह लेखी हरकती नोंदवाव्यात. मुदतीत हरकत न आल्यास मुदतीनंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाही व आमचे पक्षकार हे सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. ही जाहिर नोटीस, नाशिक. तारीख १३/१२/२०२५.

**आमच्यामार्फत प्रसिद्ध, सही/-**

**ॲड. जयवंतकुमार एस. वाटपाडे**
**ऑफिस पत्ता- ऑफिस नंबर ४. अनंत गौरव चेंबर्स, इंडियन बँकेचे वर, मेहेर सिग्नल, नाशिक- ४२२००२. मो. नंबर -९४०४०६५८९९**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, **मिळकतीचे वर्णन** : तुकडी जिल्हा नाशिक, पोटतुकडी तालुका नाशिक पैकी नाशिक गाव **बेळगाव ढगा** येथील शेतमिळकत यांसी **सर्व्हे नं. २५९** यांसी एकूण क्षेत्र हे. ०.७४.०० आर पैकी हे. ००.२०.०० आर मिळकत यांसी आकार रु. ०.७९ पैसे या मिळकतीचे मालक **लक्ष्मण नामदेव गांगुर्डे** यांनी सदरील मिळकतीचे क्षेत्र **हे. ००.२०.०० पैकी हे. ००.१०.०० आर** या मिळकतीबाबत आमचे पक्षकार यांचेबरोबर खरेदी विक्रीचा व्यवहार करून विसाराची रक्कम स्विकारलेली असल्याने उपरोक्त मिळकतीचे कामी सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे. तत्राप सदरील मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारे गहाण, दान, लिज, लिन, अन्नवस्त्र अथवा कोणत्याही जडजोखमीत जसे करार, साठेखत यामध्ये गुंतविलेली असल्यास सदरील नोटीस प्रसिद्ध झालेपासून **१५** दिवसांचे आत आमचे खालील पत्त्यावर लेखी हरकती नोंदवाव्यात. परस्पर प्रसिद्ध होणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. कळावे, ही जाहीर नोटीस.

**ॲडव्होकेटस् रमेश आर. शिरसाट,** मो.नं. ९३७३९०१२२०
**प्रणिता आर. शिरसाट,** मो. नं. ७७५८०२५३२४
चेंबर नं. ११६/२, जिल्हा न्यायालय आवार, नाशिक- ४२२००१.

## जाहीर नोटीस (टायटल व्हेरिफिकेशनकामी)

तमाम लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, **मिळकतीचे वर्णन** - तुकडी जिल्हा नाशिक, पोट तुकडी तालुका नाशिक पैकी **मौजे देहेगांव** या गांवचे शिवारातील मिळकती येणेप्रमाणे. १. **भूमापन क्रमांक व उपविभाग २९९,** यांसी **एकुण क्षेत्र ०० हे. ३६.४० आर** पैकी **क्षेत्र ०० हे. १९.०० आर+ पो.ख.क्षेत्र ०० हे. ०३.०५ आर** पैकी सदर नोटिसीचा विषय असलेल्या अविभक्त हिश्श्याचे **क्षेत्र ०० हे.९.५ आर + पो.ख. क्षेत्र ०० हे. १.५२५ आर.** २. **भूमापन क्रमांक व उपविभाग ३३६,** यासी **एकुण क्षेत्र ०० हे. २०.७० आर पैकी क्षेत्र ०० हे. ११.२० आर** पैकी सदर नोटीसीचा विषय असलेल्या अविभक्त हिश्याचे **क्षेत्र ०० हे. ५.६ आर. ३. भूमापन क्रमांक व उपविभाग ४४७** यांसी **एकुण क्षेत्र ०० हे. २५.५० आर** पैकी **क्षेत्र ०० हे. २०.५० आर+पो.ख.०० हे. ०५.०० आर** पैकी सदर नोटीसचा विषय असलेल्या अविभक्त हिश्याचे **क्षेत्र ०० हे. १०.२५ आर+पो.ख. क्षेत्र ०० हे. २.५ आर ४. भूमापन क्रमांक व उपविभाग ४६५,** यासी **एकुण क्षेत्र ०२ हे. ४७ आर पैकी क्षेत्र ०० हे. १९.५० आर पैकी** सदर नोटीसीचा विषय असलेल्या अविभक्त हिश्याचे **क्षेत्र ०० हे. ९.७५ आर. ५. भूमापन क्रमांक व उपविभाग ४७२** यासी **एकुण क्षेत्र ०१ हे. ५५ आर पैकी क्षेत्र ०० हे. ३७.५० आर** पैकी सदर नोटीसीचा विषय असलेल्या अविभक्त हिश्याचे **क्षेत्र ०० हे. १८.७५ आर.** सदर शेतजमिन मिळकती या **भिमाबाई भवानी बिन्नर** यांच्या अविभक्त मालकीच्या व कब्जेवहिवाटीच्या असून त्यांनी सदर मिळकती या निर्वेध व बिनबोजाच्या असल्याचे खात्रीने सांगितले असून आमचे पक्षकारांबरोबर खरेदीचा व्यवहार निश्चित केलेला आहे व विसारापोटी रक्कम देखील स्विकारलेली आहे. सबब, सदरचे मिळकतीवर इतर कोणाचाही. कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, अधिकार जसे, गहाण, दान, लिन, लिज, साठेखत, विसारपावती, कर्ज, तारण अगर इतर काही हितसंबंध असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन **१५ (पंधरा)** दिवसांचे आत खालील पत्त्यावर आमचे कार्यालयात लेखी स्वरुपात मुळ कागदपत्रासह हरकत नोंदवावी. विना दस्तऐवज अगर परस्पर वर्तमानपत्रातील व मुदतीनंतरच्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. मुदतीनंतर वरील मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे, असे रामजुन आमचे पक्षकारांतर्फे खरेदीचा व्यवहार पुर्ण करण्यात येईल, याची नोंद घ्यावी. सदर नोटीस भिमाबाई भवानी बिन्नर यांच्या सांगण्यावरून प्रसिद्ध केली आहे. नाशिक. तारीख : १४/१२/२०२५.

आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली

सही/- **शशिकुमार. एच. जाधव,** ॲडव्होकेट व नोटरी
ऑफिस : एफबी-१५ व १६, सावित्री फटाके शॉपचे वर, ठक्कर बाजार, नविन सी. बी. एस. नाशिक. मोबाईल नंबर ९८२३९९९७६१.

## नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण

**(जुने जिल्हा परिषद भवन, नाशिक, महाराष्ट्र -४२२००१)**

## ई-निविदा सूचना क्र. ०३/२०२५-२६

**नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण याद्वारे नाशिक त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा २०२७ साठी Third- Party Quality Control -Agency नेमन्यासाठी प्रस्ताव मागवित आहे.**

प्रस्ताव सादर करण्याची शेवटची दिनांक आणि

**वेळ : ३०/१२/२०२५ (upto 16:00 Hrs)**

अधिक माहितीसाठी कृपया भेट द्या. **-www.mahatenders.gov.in.**

टीप: या अधिसूचनेतील कोणताही बदल किंवा सुधारणा फक्त वरील संकेतस्थळावरच प्रसिद्ध केली जाईल.

सही/-
**कुंभमेळा आयुक्त तथा सदस्य सचिव**
नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण

## ई-निविदा सूचना क्रमांक २४/२०२५-२६

## संक्षिप्त निविदा सूचना

कार्यकारी अभियंता, सा. बां. विद्युत विभाग, नाशिक दूरध्वनी क्र. ०२५३-२५७८०१२ E-mail- elnashik.ee@mahapwd.gov.in हे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विद्युत विभागाकडून शासन निर्णयानुसार विस्तृत निविदा सुचनेत दर्शविल्यानुसार व तत्सम कामाचा अनुभव असलेले कंत्राटदार यांचेकडून 'ब-१' नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या **https://mahatenders.gov.in** या संकेत स्थळावरुन डाऊनलोड करणेत यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा किंवा कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा. बां. विद्युत विभाग, नाशिक यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

**कामाचे नांव : नाशिक जिल्ह्यातील एकुण १८ काम**

ई-निविदा उपलब्ध कालावधी : दिनांक १५.१२.२०२५ ते २२.१२.२०२५ ई-निविदा उघडणे : दिनांक २३.१२.२०२५

**https://mahatenders.gov.in** या संकेत स्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे. निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास संकेतस्थळावरती कळविण्यात येईल.

सही/-
**कार्यकारी अभियंता,**
सा. बां. विद्युत विभाग, नाशिक

**आरओसी- २०२५-२६/क्र.५ सी ४५५४**